# धान उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या



**गोंदिया:** जिल्ह्यातील मुख्य व्यवसाय हा शेतीचा आहे. पावसाची सरासरी जास्त असल्याने पावसाळ्यात धान पीक घेतले जाते. धानशेतीवर आधारित उद्योग या मुळे जिल्ह्यात वाढीस आला. असे असले तरी योग्य नियोजन होत नसल्याने या व्यवसायावर अवलंबून असणारा शेतकरी, शेतमजूर आणि उद्योजक यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सिंचनासाठी शेतकरी निसर्गावर अवलंबून आहे. सरकारी यंत्रणांचे सिंचन विकासावर लक्ष नाही. महावितरणच्या भारनियम नामुळे या मागास जिल्ह्याची प्रगती होण्याऐवजी नुकसानच अधिक होत असल्याचे चित्र आहे. भंडारा जिल्ह्याचे विभाजन करून गोंदिया जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. आज जिल्हानिर्मितीला २५ वर्षे पूर्ण होत आहे. नागरिकांच्या विकासाच्या आशा कितपत पूर्ण झाल्या याचा आढावा बेरार टाईम्सने या वर्धापनदिनी घेतला.

**उत्तम बियाण्यांची कमतरता**

शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी उत्तम प्रतीचे धानाचे वाण उपलब्ध होत नसल्याने मिळेल त्या बियाण्यांची पेरणी करणे अपरिहार्य होते. यासाठी उत्तम प्रतीचे धान बियाणे जूनमध्ये उपलब्ध होणे गरजेचे आहे. खासगी ओलिताची सोय असणारे शेतकऱ्यांना याचा नक्की फायदा होईल. हे बियाणे उशिरा उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांना चढ्या दराने बियाणे विकत घ्यावे लागतात. यामुळे अनेकदा शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे प्रकारसुद्धा समोर आले. यावर जिल्हा परिषदेच्या व राज्य शासनाच्या कृषी विभागाने तोडगा शोधून धान पेरणी अगोदर बियाणे उपलब्ध करून देण्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे.

**जिल्ह्यात सिंचनाचा अभाव**

गोंदिया जिल्हा हा तसा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. पण तलावांचा जिल्हा असतानासुद्धा येथील शेती तहानलेलीच आहे. या जुन्या तलावांची देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष असल्याने या तलावांतून शेतीला सिंचन होत नाही, हे वास्तव आहे. या छोट्या तलावांची देखभाल दुरुस्ती वेळेवर केल्यास पाण्याचे नियोजन करून पिकाला वेळेवर पाणी देणे शक्य होईल. परंतु, त्याकडे पाटबंधारे विभागाने लक्ष दिले नाही. पाणी वापर सहकारी संस्था निर्माण करून शेतकऱ्यांत जनजागृती करणे आवश्यक आहे. असे झाल्यास पाण्याचे नियोजन व वापर योग्य होईल. पाण्याच्या वितरण व्यवस्थेत सुधारणेची गरज आहे.

**शेतीला भारनियमनाचा फटका**

राज्य सरकारने भार नियमन बंद करून वीज २४ तास पुरवावी, असा मत प्रवाह आता समोर येऊ लागला आहे. त्याकरिता वीज आकारणी ही पूर्ण दराने केलेली चालेल. कारण वीजपुरवठा खंडित होणे, तसेच भारनियमनाचे थेट परिणाम शेतीवर असल्याने त्याचा पीक उत्पादनावर परिणाम होतो. कृषी पंपासाठी वेगळ्या वीजवाहिन्या तयार करून २४ तास वीज पुरवठा केला गेला पाहिजे.

**बियाणे, खते, कीटकनाशकांच्या किमती व दर्जा**

धान बियाणे उत्कृष्ट असल्याची पडताळणी केल्यानंतरच शेतकऱ्याला ते बियाणे पुरविण्यात यावे. तसेच निकृष्ट दर्जाच्या पुरवठ्यावर योग्य नियंत्रण ठेवून किमती परवडणाऱ्या असाव्यात. खतांचा पुरवठाही सर्वसाधारण दरात व्हावा.

**आणेवारी पद्धतीत बदलाची गरज**

शेतीच्या पीकपद्धतीत तसेच उत्पादनात वाढ ही संकरित बियाण्यांमुळे झाली तरी कालबाह्य आणेवारी पद्धत अद्यापही अवलंबिली जात आहे. यामुळे उत्पादन खर्चाचा कोठेही ताळमेळ बसत नाही. जेव्हा नैसर्गिक परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते, तेव्हा ही कालबाह्य झालेली आणेवारी पद्धत शेतकऱ्यांसाठी मारक ठरते.

यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचा विमा जरी उतरवला असेल तर त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळत नाही. यामुळे आजच्या परिस्थितीचा विचार करून आणेवारी पद्धत केंद्र सरकारने बदलली पाहिजे. हे बदल विशेषतः धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत गरजेचे आहेत. असे बदल झाल्यास अडचणीच्या काळात शेतकऱ्यांचे हाल होणार नाही.

**शासकीय मदत वेळेवर मिळाली पाहिजे**

शेतकऱ्यांना शासकीय मदत ही हंगामापूर्वी मिळत नाही. त्यामुळे सरकारने पुरविलेल्या सोई या शेतकऱ्यांसाठी पाहिजे तशा फायद्याच्या ठरत नाही. पैसा खर्च तर होतो, पण त्यातून शेतीविकास होत नाही. यासाठी सरकारी नियोजनात सुधारणा करण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांना वेळेवर शासकीय मदत मिळाली तर त्याचा उत्पादनावर नक्कीच फायदा होईल. शिवाय कृषी विभागाच्या वतीने देण्यात येणारे अवजारांचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिले गेले पाहिजे. त्याकरिता मार्गदर्शन पर शिबिराचे आयोजन करून भातपिकाची लागवड व अवजारांचा वापर कसा करावा, याकरिता हंगामपूर्व शिबिरे कृषी विभागाने आयोजित केल्यास शेतकऱ्यांना लाभ होईल. सरकारी नियोजन शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर पोचले तर त्यातील गैरप्रकारांना सुद्धा आळा बसू शकेल आणि शेतकऱ्यांमधील सरकारी धोरणांविषयी असलेली उदासीनता दूर होण्यास मदत मिळू शकेल.

**बाजारपेठ**

जिल्ह्यात कृषी उत्पन्न बाजार समित्या नसल्यात जमा आहेत. येथे सहकारी संस्थेमार्फत खरेदी होते. साहित्याचा अभाव, वेळेवर मोबदला न देणे, प्रतवारी उशिरा करणे आदी कारणांनी उत्तम प्रतीचे धान घेतले जात नाही. त्यामुळे शेतकरी धान पडेल त्या भावात व्यापाऱ्यास विकतो. जेथे कृषी उत्पन्न बाजार समिती आहे, तेथे दलालामार्फत धान विकले जात असल्याने कमिशनचा प्रश्न येतो. थेट व्यापाऱ्यास विकल्यास पैसे उशिरा मिळतात. त्याकरिता राज्य सरकारने सहकारी संस्थांमाफ 'त खरेदी करून शेतकऱ्यांचे धान्य साठवून ठेवावे. तात्पुरती मदत म्हणून पैसे उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांचे शोषण होणार नाही.

**परप्रांतीय आयात**

जिल्ह्यात परराज्यातून धानाची आवक मोठ्या प्रमाणावर होते. याचा थेट परिणाम स्थानिक शेतकऱ्यांवर होतो. शेतमालाला चांगला भाव या आयातीमुळे मिळत नसल्याने धानशेतीची परिस्थिती आणखी बिघडत चालली आहे. येथील धानाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी किमान मार्च-एप्रिलपर्यंत इतर जिल्ह्यातील धान आयातीवर निर्बंध घातले गेले पाहिजे.

| | |
|---|---|
| ★लागवडीखालील क्षेत्र– | २,२०,६१२ हेक्टर आर |
| ★चराई क्षेत्र– | ८६,००० हेक्टर आर |
| ★वनक्षेत्र– | २,१५,००० हेक्टर आर |
| ★सचन तलाव मोठे प्रकल्प– | २ |
| ★मध्यम प्रकल्प– | ८ |
| ★लघू प्रकल्प– | २० |
| ★एकूण सिंचन– | १,०३,५१४ हेक्टर |

## जिल्हा निर्मितीपासून प्रशासकीय अधिकारी व पदाधिकारी

### ★जिल्हा परिषद अध्यक्ष

१) ॲड.के.आर.शेंडे २) प्रल्हाद भोयर, ३) श्रीमती रजनी नागपुरे, ४)चंद्रशेखर ठवरे, ५) नेतराम कटरे ६) विजय शिवणकर, ७) श्रीमती उषाताई मेंढे,८) श्रीमती सीमा मडावी, ९) प्रशासक, १०) पंकज रहांगडाले (विद्यमान अध्यक्ष)

### ★जिल्हाधिकारी

१)संजीवकुमार २)लोकेशचंद्र ३)रुपिंदरसिंह ४)विष्णुप्रसाद बुटे ५)अविनाश झाडे, ६)डॉ. यशवंत गेडाम, ७)कमलेश सोनाडे ८)प्रदीप काळभोर ९) सचिंद्र पतापसिंह, ८)डॉ.अमित सैनी,१०) डॉ.विजय सूर्यवंशी, ११) अभिमन्यू काळे, १२) डॉ. कांबदरी बलकवडे, १३), दीपककुमार मीना, १४) राजेश खवले, १५) श्रीमती नयना गुंडे, १६) चिन्मय गोतमारे, १७) प्रजीत नायर(विद्यमान जिल्हाधिकारी)

### ★मुख्य कार्यकारी अधिकारी

१)राजन भवरे २)श्रीमती आभा शुक्ला ३) व्ही.रा. बन्गीनवार ४)श्याम बेझलवार (प्रभारी) ५)निरंजनकुमार सुधांशू ६) आर.पी.सव्वालाखे ७) प्रदीप काळभोर, ८)ए.वाय.जाधव, ९)सौरभ राव, १०)ए.वाय.जाधव, ११) अभिषेक कृष्णा, १२) एम.एस. जगताप, १३) एच.आर.लोणारे, १४) एम.एस. जगताप, १५) डॉ. यशवंत गेडाम १६) प्रदीप काळभोर, १७)अरुण डुबे (प्रभारी) १८)) डी.डी.शिंदे, १९) राहूल रेखावाल २०) जयवंत पाडवी, २१) डी.बी.गावळे, २२) डॉ.सी.एल. पुलकूलवार २३) डॉ. अभिमन्यू काळे २४) आर.एच. ठाकरे २५) डॉ. राजा दयानिधी, २६) राजेश खवले २६) प्रदीपकुमार डांगे २७) राजेश खवले २८) अनिल पाटील २९) एम.मुरुगनाथन(विद्यमान मुकाअ)

### ★पालकमंत्री

१)प्रा.महादेवराव शिवणकर २)ना.दत्ता मेघे, ३) ना. अनिल देशमुख, ४) ना.डॉ.विजयकुमार गावित, ५) ना.अनिल देशमुख, ६) नाना पंचबुद्धे ७) इंजि.राजकुमार बडोले ८) डॉ. परिणम फुके ९) अनिल देशमुख ९) नवाब मलिक,१०) प्राजक्त तणपुरे ११) सुधीर मुनगंटीवार १२) धर्मरावबाबा आत्राम(विद्यमान पालकमंत्री)

### ★पर्यटन व प्रेक्षणीय स्थळ

नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान,नागझिरा अभयारण्य,प्रतापगड,पोंगेझरा, सूर्यादेव माडोदेवी,महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान डाकराम सुकडी, शशीकरण पहाडी,नागरा,गोंदिया, हाजरा फॉल,कचारगड,महादेव पहाडी,ढास,

### ★विश्रामगृह-

गोंदिया, आमगाव, तिरोडा, गोठणगाव, शिरपूर, देवरी, चुलबंध, अर्जुनीमोर, नवेगावबांध, नागझिरा, सालेकसा, सौंदड.

### ★लोकसभा क्षेत्र-

(गोंदिया-भंडारा व गडचिरोली-चिमूर)
विधानसभा मतदारसंघ -
गोंदिया,तिरोडा, अर्जूनी मोर व आमगाव)

### ★खासदार

प्रफुल्ल पटेल (राज्यसभा खासदार), सुनील मेंढे (भंडारा-गोंदिया क्षेत्र), अशोक नेते (गडचिरोली-चिमुर)

## जिल्ह्याला विकासाच्या प्रवाहात आणण्याचे प्रयत्न- ना.आत्राम

**गोंदिया** जिल्हा निर्मितीनंतर गोंदिया जिल्ह्याच्या पालकत्वाची जबाबदारी अनेक मंत्र्यांवर सोपविण्यात आली होती.सध्याच्या घडीला जिल्हा आपल्या स्थापनेच्या २५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे.या रौप्य महोत्सवी वर्षात जिल्ह्याचे पालकत्व सांभाळण्याची जबाबदारी राज्याचे अन्न औषध व प्रशासन विभागाचे मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्याकडे आहे.



सर्व प्रथम गोंदिया जिल्हा वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या सर्व जनतेला शुभेच्छा. गोंदिया जिल्हा निर्मितीला १ मे रोजी २५ वर्षे पूर्ण होत असून रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहोत. पालकमंत्री व संबधित विभागाचे मंत्री म्हणून जबाबदारी पार पाडतांना जिल्ह्याच्या विकासासाठी अधिकाधिक निधी जिल्हा नियोजन विभागाच्या माध्यमातून आणण्याचे प्रयत्न सुरु असुन आदिवासी व गैरआदिवासी योजनेतही विकास कामांना प्राधान्य दिले जात आहे. निधीतून विकासात्कम कामातून देखील मिळवून दिला.

जिल्ह्यातील अनेक विभागात वरिष्ठ अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, या रिक्त पदांवर लवकरच नेमणुका करण्यासंदर्भात पालकमंत्री म्हणून पुढाकार घेतल्याने अनेक पदे भरली गेली. काही पदे रिक्त असून ती सुध्दा भरण्याची प्रकिया लवकरच सुरु होणार आहे.आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा असल्याने जिल्ह्यातील पोलीस दलाला बळकट करण्याकरीता तसेच नक्षल उच्चाटनाकरीता निधीही उपलब्ध करुन दिला जात आहे.जिल्ह्याने आपल्या या २५ वर्षाच्या काळात शासनाच्या विविध योजनांत चांगले कार्य केले आहे.त्यामध्ये स्वच्छता अभियान, तंटामुक्त अभियानासह निर्मलग्राम योजनेत उल्लेखनीय कामगिरी केली.गोंदिया जिल्ह्याने ग्रामस्वच्छता अभियानात राज्यस्तरावर द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावून या अभियानात आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा सुध्दा काम करू शकतो, हे निर्मितीनंतर अल्पावधीतच दाखवून दिले. त्यातही महात्मा गांधी तंटामुक्त म ोहिमेत या जिल्ह्याने राज्यात सर्वाधिक गावे तंटामुक्त करण्याचे केलेले काम खरोखरच प्रसंशनीय असेच आहे. प्रत्येकाच्या घरी शौचालय व गाव हागणदारीमुक्त व्हावे, यासाठी केंद्रसरकारने सुरू केलेल्या निर्मलग्राम योजनेला सुध्दा जिल्ह्यातील ग्राम पंचायतीने उत्कृष्ट साथ दिली आहे.

राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीसाठी शासनाने मदत सुध्दा केली आहे.

सिंचनाची सोय पूर्ण व्हावी, यासाठी धापेवाडा उपसा सिंचन योजनेच्या टप्पा २ सह रजेगाव काटी, तेढवा काटी, ओवारा, कलपाथरी, चुलबंध, कटंगी आदी प्रकल्पांना शासनाने निधी देऊन या प्रकल्पाची कामे केली आहेत. या प्रकल्पातून पाणी शेतात जाताच हरितक्रांती येणार, यात शंका नाही. त्याचप्रमाणे औद्योगीक विकासात आता अदानी समूहाच्या वीज प्रकल्पाने आणि बिरसी विम ानतळावरील पायलट प्रशिक्षण केंद्राने भर घातली आहे. नागझिरा नवेगावबांध अभयारण्याचा होणारा विस्तार आणि व्याघ्र प्रकल्प ठरल्याने पर्यटकांची याभागात वर्दळ वाढेल व स्थानिक रोजगार वाढीस मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सडक ग्राम योजनेच्या माध्यमातून गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येक गावे ही पक्क्या रस्त्यांनी जोडण्याचे काम प्रगतीपथावर असल्याने खेडेगाव तालुका व जिल्ह्याशी जोडले गेले आहे.आरोग्य सेवा बळकटीकरणाच्या उद्देशानेच जिल्हा रुग्णालयासोबतच वैद्यकीय महाविद्यालयाची सेवा ही गोंदिया भंडारा जिल्ह्यासह शेजारील बालाघाट जिल्ह्याला सुध्दा लाभदायक ठरणार असल्याचे पालकमंत्री आत्राम यांनी सांगितले.

## रौप्य महोत्सवी वर्षात पंचायत समित्यांना नव्या इमारती मिळणार

**गोंदिया-** गोंदिया जिल्हा निर्मितीला १ मे रोजी २५ वर्ष पूर्ण होत आहे. या रौप्य महोत्सवी वर्षा पर्यंतचा जर आढावा घेतल्यास जिल्हा परिषद जे ग्राम विकासाचे केंद्र बिंदू आहे. त्या जिल्हा परिषदेला सध्याच्या परिस्थितीत संगणकीय यंत्रणेशी जोडणे महत्व-ाचे आहे. जिल्हा परिषद ते पंचायत समिती व पंचायत समिती ते ग्राम पंचायत पर्यंत संगणीकृत यंत्रणेची कनेक्टिवीटी करणे आपल्याकरिता महत्वाचे ध्येय या रौप्य महोत्सवी वर्षात आहे. सोबतच जिल्हा निर्मितीनंतर अनेक पंचायत समित्यांच्या इमारती या मोडकडीस आल्याने प्रशासकीय कामकाज हाकताना प्रशासनावर ताण पडतो तो पाण दूर करण्याकरिता नवीन प्रशासकीय इमारती तयार करुन आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याचे आपण नियोजन केल्याची माहिती जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी दिली.



गोंदिया जिल्हा परिषद निर्मितीनंतर राज्य सरकारने विशेष दर्जा दिला आहे. या विशेष दर्जातून जिल्हा परिषदेला क वर्गात आणण्याकरिता प्रयत्न करणार असून या माध्यमातून जिल्हा परिषद यंत्रणेला अधिक कर्मचारी संख्या मिळण्यास मदत होणार आहे. जिल्हा परिषदेतील अनेक विभागात रिक्त पदे असल्याने कामकाजाचा ताण अपुऱ्या कर्मचाऱ्यावर पडतो. त्यामुळे ग्रामविकासाला पाहिजे तसे यश मिळत नाही. यामुळे नोकर भरती व कर्मचाऱ्यांचा असलेला बॅकलॉग या रौप्य महोत्सवी वर्षात सरकारने भरावा याकरिता आपण पाठपुरावा करणार असल्याचेही जि.प. अध्यक्ष रहांगडाले यांनी सांगितले. सोबतच जिल्हा नियोजन व जिल्हा परिषदेच्यावतीने विविध योजना राबविल्या जातात. त्या योजना राबविताना अनुसूचित जाती जमाती च्या घटकांना ज्या पद्धतीने लाभ मिळतो.

त्याचप्रमाणे ओबीसी प्रवर्गातील घटकालाही लाभ मिळावा याकरिता जिल्हा परिषद स्तरावर ओबीसींच्या योजना कार्यान्वित करण्यात यावे याकडे आपण प्रयत्नशील असल्याचे सांगितले. गावखेड्यातील शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करुन देत गा-वातील मुलांना उच्च शिक्षण आणि चांगले शिक्षण खासगी शाळेच्या तुलनेत मिळावे यासाठी प्रयत्न सुरु असून या कडीतच सुमारे ३०० शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील सेवा गावातच उपलब्ध करून देण्यासाठी ङजिल्हा परिषद आपल्या दारीफ योजना राबविल्याची माहिती जि. प.चे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी दिली.

समाजाच्या प्रत्येक घटकाला विकासाच्या प्रवाहात आणने, हे उद्दिष्ट घेऊन आपण काम करत आहोत. एका वर्षाच्या कार्यकाळात जि. प.ला १२२२ योजना प्राप्त झाल्या. केंद्र शासनाच्या हर घर नल, हर घर जल योजनेमार्फत जि. प. अंतर्गत २०२४ पयंर्त शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यात येणार आहे. यासाठी कार्यशाळा आयोजित करून प्रशिक्षण देण्यात आले आहे. यंदाच्या उन्हाळ्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ५३ टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे.

## चला नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात

**गोंदिया:** जिल्ह्याला नवे-गाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पासह निसर्गाचे वरदान लाभले आहे. त्यात आता प्रकल्पात आणखी वाघोबा सोडण्यात आले असून त्यांचे हमखास दर्शन होत असल्याने पर्यटकांची पावले आता नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकडे आपसुकच वळत आ-हेत. हेच कारण आहे की, मागील एप्रिल, मे व जून महिन्यांत तब्बल १५ हजार ३८१ पर्यकांनी व्याघ्र प्रकल्पात जंगल सफारीचा आनंद लुटला. त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माणूस आपल्या हव्यासापोटी जंगलांना नष्ट करुन तेथेही सिमेंट क्राँक्रीटचे जंगल उभारत आहे. परिणामी आज मोकळा श्वास घेण्यासाठी मानवालाच नैसर्गिक वातावरण उरलेले नाही. यामुळेच माणसाला या धकाधकीच्या जी-वनात काही काळ निवांत वेळ घालविण्यासाठी निसर्ग सानिध्याची गरज भासत आहे. यासाठी वन विभागाने राखून ठेवलेल्या जंगलाकडे त्यांची पावले आपसूकच वळत आहेत. हेच कारण आहे की, शहरी नागरिकांचा कल आता वन पर्यटनाकडे दिसत आहे.



जिल्हावासीयांसाठी नागझिरा व्याघ्र प्रकल्प वरदान ठरत असून, येथे नेहमीच पर्यटकांची गर्दी असते. मात्र उन्हाळ्यात एप्रिल, मे व जून हे तीन महिने जंगल सफारीसाठी महत्वाचे असतात.

मागील वर्षातील आकडेवारी जाणून घेतली असता एप्रिल, मे व जून महिन्यांत व्याघ्र प्रकल्पात तब्बल १५ हजार ३८१ पर्यटकांनी जंगल सफारी केली आहे. विशेष म्हणजे मे महिन्यात शाळा-महाविद्यालयांना सुट्टी असते व उन्हाळ्यात प्राणी पाहण्यासाठी बाहेर पडत असल्याने मे महिन्यात पर्यटकांची सर्वाधिक गर्दी दिसून आली आहे.

### दोन वाघोबांची पडली भर

**नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या चांगलीच आहे. त्यात आता दोन वाघिणींना सोडण्यात आले आहे. उन्हाळ्यात गवत वाळून जाते व त्यामुळे प्राणी दृष्टीस पडतात. त्यातही पाण्यासाठी प्राणी बाहेर पडत असल्याने उन्हाळा जंगल सफारीसाठी उत्तम काळ मानला जा-तो. यंदा आतापर्यंत शाळांच्या परीक्षाच सुरु होत्या. त्यातच लोकसभा निवडणुकीमुळे सर्वांच्या नजरा त्याकडेच लागून होत्या व नोकरदारांनाही सुट्या नव्हत्या.मात्र आता परीक्षा व निवडणूक आटोपली असून येणाऱ्या दिवसांत व्याघ्र प्रकल्पात वाघोबांच्या दर्शनासाठी प्रकल्पात गर्दी वाढणार यात शंका नाही.**


### वन विभागाला ३१.६६ कोटींचे उत्पन्न

**मागील वर्षी तीन महिन्यांत १५ हजार ३८१ पर्यटकांनी व्याघ्र प्रकल्पाला भेट दिली असून यातून वन विभागाने तब्बल ३१ लाख ६६ हजार ९२० रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. यात एप्रिल महिन्यात सात लाख ९१ हजार १८५ रुपये, मे महिन्यात १२ लाख ६९ हजार ५२५ रुपये तर जून महिन्यात ११ लाख सहा हजार २१० रुपयांचे उत्पन्न वन विभागाला मिळाले आहे. या पर्यटकांनी दोन हजार ७६२ प्रकल्पात प्रवेश केला आहे.**




स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# गोंदिया जिल्ह्याची २५ वर्षे : एक विहंगावलोकन



तत्कालीन भंडारा, गोंदिया व साकोली अशा तीन तालुक्यांचा समावेश असलेल्या भंडारा जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीला तालुक्याला दर्जा देण्याचे ऐतिहासिक काम तत्कालीन मुख्यमंत्री बॅरि.ए.आर.अंतुले यांनी दि.१ मे १९८६ ला घडवून आणण्याची किमया केली. त्यामुळे तत्कालीन भंडारा जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या १३ झाली. (भंडारा, पवनी, लाखांदूर, अर्जुनी-मोरगांव, साकोली, देवरी, सालेकसा, आमगांव, गोंदिया, गोरेगांव, तिरोडा, तुमसर, मोहाडी) यानंतर आणखी लाखनी व सडक-अर्जुनी अशा दोन तालुक्यांची निर्मिती करण्यात येऊन तत्कालीन भंडारा जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या १५ झाली. देवरी व सालेकसा या आदिवासीबहुल, वन्यबहुल व नक्षलप्रभावित तालुक्यातील टोकावरील गावातील लोकांना तत्कालीन भंडारा हे जिल्हस्थान कोणत्याच दृष्टीने सोयीचे पडत नव्हते. या सर्व बाबींचा साधक-बाधक व सकारात्मक विचार होऊन दि.०१ मे १९९९ ला भंडारा जिल्ह्याचे विभाजन होऊन गोंदिया या नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. या नवनिर्मित गोंदिया जिल्ह्यात गोंदिया, गोरेगांव, तिरोडा, सडक-अर्जुनी, अर्जुनी-मोरगांव, देवरी, आमगांव व सालेकसा असे आठ तालुके समाविष्ट करण्यात आले.

या आठही तालुक्यातील सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, शेतीविषयक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचे साकल्याने अवलोकन केले असता या आठही तालुक्यात जनसमूहाच्या एकूणच सम्यक व शाश्वत विकासासाठी आवश्यक अशी निसर्गाधारित व अन्य संसाधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत, हे प्रथमदर्शनीच दिसून येते. या जिल्ह्याला मी महाराष्ट्रातील काश्मीर अशी उपाधी देऊ इच्छितो. कारण बर्फ़ आणि खचणारे डोंगर वगळता उर्वरित जवळपास सर्वच बाबतीत आमचा हा गोंदिया जिल्हा काश्मीरशी तुलना करायला उत्सुक दिसून येतो. लहान-मोठे विविध डोंगर/टेकड्या, घनदाट जंगल, विविध प्रकारची वन्यबहुलता, प्रत्येकच गावात तलावांची समृद्ध परंपरा, मंदिरे व विहारादिंची नाविन्यपूर्ण बहुलता, वनपर्यटन, अन्य निसर्गरम्य व चमत्कारिक ठरू शकतील अशी विविध पर्यटनस्थळे, बांधबंधारे - (पुजारीटोला ते बोदलकसा पर्यंत विविध बांध) किमान का असेना बोटिंगची सोय, आशिया खंडातील सर्वात मोठी निसर्गनिर्मित कचारगड गुफ़ा, सूर्यादेव-मांडोबाई येथील अजून शोध न लागलेली गूढतम गुफ़ा, अशा काही बाबी काश्मीरच्या तत्संबंधित बाबींच्या तुलनेत काहीशा कमी असल्यातरी विपुल प्रमाणात आढळून येतात. काश्मीरमधील दहशतवाद व आमच्याकडील नक्षल-वाद अशीही एक नकारात्मक तुलना सुद्धा मांडता येईल. म्हणूनच मी आमच्या गोंदिया जिल्ह्यासहित एकूणच झाडीपट्टीला महाराष्ट्राचे काश्मीर असे संबोधत असतो.

असा हा निसर्गसमृद्ध गोंदिया जिल्हा उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत, सर्वच बाबींत, अगदीच मागासलेला असण्याची खंत आम्हा गोंदिया-जिल्हावासीयांना आता बोच-तही नसावी असे वाटून जाते. मुंबई-नागपूर हा समृद्धी महामार्ग घोषित झाला व त्याचे बांधकामही जोरा-शोरात सुरु झाले तेव्हा मी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना ईमेल व साध्या पोस्टाने पत्र/अर्ज/निवेदने पाठवून महाराष्ट्राचे पूर्व टोक नागपूर येथे थांबत नसून ते गोंदिया-देवरीपर्यंत असल्याचे सादर कळविले होते. फ़ेसबुकवर व इतरत्र व्याख्यान देतानाही मी हा मुद्दा प्रामुख्याने मांडत असे. अखेर, माझ्या या मुंगी-प्रयत्नाने नव्हे तर कोणत्यातरी राजकीय रेट्याने, सदरील समृद्धी महामार्ग गोंदियापर्यंत मान्य झाला असून त्याचे संबंधित नोटिफ़िकेशनही प्रसिद्ध झाल्याचे दिसून येते. हा समृद्धी महामार्ग आणि या जिल्ह्याला छेदून जाणारा मुंबई-कोलकाता हा रेल्वेमार्ग या जिल्ह्यातील शेतीविषयक व इतरही मुख्य उत्पादनाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात खूपच सोयीचा असला तरी आमची राजकीय व्यवस्था मात्र यासंदर्भात बहुतांश कुचकामी व/वा उदासीन ठरत असल्याचे दिसून येते. हे आमचे दुर्दैवच!

पश्चिम महाराष्ट्रच नव्हे तर मराठवाड्यासारख्या मागास भागातीलही राजकीय व्यवस्था किती सजग आणि विकासात्मक दृष्टीने आक्रमक असते/आहे, हे मी स्वतः त्या भागातील माझ्या शासकीय सेवाकाळात स्वानुभवले आहे. पण कदाचित आमच्याकडील या वन्यबहुल व आदिवासीबहुल भागाचा स्वभावजन्य आळशीपणा किंवा उदासीनता तर याला जबाबदार/कारणीभूत नसावा/नसावी अशी मला पुष्कळदा भलतीच शंका सतावत असते. कोणत्याही भूभागातील जन-तेचा सम्यक व शाश्वत असा सर्वंकष विकास साधून घेण्यासाठी सहकार या संकल्पनेला अजूनतरी यथोचित पर्याय सापडल्याचे आढळून येत नाही, इतके हे महत्त्व सहकाराला आहे. आणि ही बाब भारताचे सध्याचे गृहमंत्री यांनी चांगल्याप्रकारे ओळखल्याचे सुचिन्ह दिसून येत आहे. केंद्र शासनाच्या मंत्रीमंडळात आजवर कधीही स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन/निर्माण केले गेले नव्हते. सध्या केंदीय मंत्रीमंडळात असे सहकार मंत्रालय सुरू झाले असून त्याद्वारे कामकाजाला जोरदार सुरुवात सुद्धा झाल्याचे दिसून येत आहे. अशा या सहकार संकल्पनेबाबतची व अर्थातच सहकारी संस्था/व्यवस्थेबाबतची आपल्या भागातील अनास्था व उदासीनता मला, एका निवृत्त डीडीआरला खटकते. आमच्या भागातील या अशा अनास्था व उद-ासीनते बद्दलचे एक कटूतम उदाहरण येथे नमूद करणे मला आवश्यक वाटते. आपल्या भागातील/जिल्ह्यातील एक राजकीय व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात सहकाराचे उपमंत्री असतानाच त्यांच्याच विधानसभा क्षेत्रातील दोन तालुक्यातील सहायक निबंधकांची राजपत्रित अधिका?यांची पदे निरस्त करण्यात आली. अशी दोन पदे निरस्त करून सहायक निबंधकांचे कार्यालय सुद्धा पदावनत करून, सहकार अधिकारी श्रेणी-१ या अराजपत्रित/तृतीय वर्गातील पद-ाला कार्यालय प्रमुख करण्यात आले. आणि त्या तालुक्यातील सहायक निबंधकांचे वैधानिक अधिकार जवळच्या तालुक्यातील सहायक निबंधक या राजपत्रित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आले. हा कोणा एका राजकीय व्यक्तिमत्त्वाचाच फ़क्त दोष नसून तद्विषयक आमची राजकीय जाण व शक्ती किती आहे, याचेच हे एक ऋणात्मक द्योतक म्हणता येईल.

अशा आमच्या या गोंदिया जिल्ह्याच्या निर्मितीला ०१ मे २०२४ रोजी पंचवीस वर्षे होत आ-हेत. आमच्या या दुर्दैवी जिल्ह्याच्या या रजत महोत्सवी वर्षाप्रसंगी मी आमच्या या जिल्ह्याला, जिल्ह्यातील सर्व नागरिकांना शुभेच्छा देतो. आणि यापुढे तरी आमचा काश्मीरशी तुलना करण्यास योग्य असलेल्या जिल्ह्यात सम्यक व शाश्वत विकासाची गंगा वाहू लागो अशी त्या निसर्ग-नियामकाला प्रार्थना करतो.

**एड.लखनसिंह कटरे,**
**(निवृत्त डीडीआर),**
**बोरकन्हार-४४१९०२,ता.आमगांव, जि.गोंदिया. चलभाष : ७०६६९६८३५०**

































# गोंदिया-भंडारा जिल्ह्याचा सर्वांगीण विकास,हेच माझे लक्ष्य-खा.पटेल

माजी केंद्रीय अवजड उद्योग व सार्वजनिक उपक्रम मंत्री प्रफुल्ल पटेल हे गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील सर्वाधिक लोकप्रिय खासदार आहेत. आपल्या कर्मभूमीचा सर्वांगीण विकास हे त्यांचे प्रमुख लक्ष्य राहिले आहे. यामुळे त्यांनी या दोन्हा जिल्ह्याच्या विकासाचे व्रत स्वीकारले आहे. गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी या जिल्ह्यातील उद्योगांसह शेतीला नवा आयाम देण्याचे प्रयत्न केले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान कसे उंचावता येईल यावर त्यांनी सतत भर दिला. यामुळे जिल्ह्यात साखर कारखाने उभारून शेतकऱ्यांना नगदी पीक घेण्याकरिता एक नवी दिशा दिली. त्यांच्या मार्गदर्शन आणि प्रयत्नांमुळे आज शेतकरी उसपिकाकडे मोठ्या प्रमाणावर वळताना दिसत आहेत. सिंचनाच्या बाबतीत रखडलेले व झुडपी जंगलामुळे वनविभागाने आडकाठी आणलेल्या अनेक सिंचन प्रकल्पांचे मार्ग त्यांनी मोकळे केले.

गोंदियाचा ऐतिहासिक वारसा असलेल्या बिरसी विमानतळाचा चेहरामोहरा त्यांनी पार बदलून टाकला. यामुळे आज बिरसी विमानतळ हे आंतरराष्ट्रीय पातळीचे वैमानिक प्रशिक्षण केंद्र म्हणून नावारूपास आले आहे. बिरसी विमानतळ हे ना. प्रफुल्ल पटेल यांच्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचले आहे.या विमानतळावरून सुरु झालेली प्रवासी वाहतूक भविष्यात विस्ताराच्या वाटेवर प्रफुलभाईंच्या प्रयत्नाने आहे.या प्रवासी विमानवाहतूकीमुळे नागझिरा नवेगाव व कान्हा व्याघ्र प्रकल्पाच्या पर्यटन व्यवसायाला चांगली संधी उपलब्ध झाली आहे. उद्योगाच्या बाबतीत सांगायचे झाले तर तिरोडा येथील वीज प्रकल्प हे डोळ्यासमोर उभे राहते. गौतम अदानी यांचा ३३०० मेगावॉट क्षमतेचा वीज प्रकल्प आज राज्यातील विजेची गरज पुर्ण करीत आहेत. गेल्या अनेर वर्षाच्या काळात प्रफुल्ल पटेल यांनी गोंदिया -भंडारा जिल्ह्याच्या खुंटलेल्या विकासाला नवी दिशा मिळवून दिली आहे.या दोन्ही जिल्ह्याच्या विकासात महामेरु ठरलेले या जिल्ह्याचे लाडके खासदार व केंद्रीयमंत्री ना.प्रफुल्ल पटेल यांच्याशी साप्ताहिक बेरार टाईम्सचे मुख्य संपादक खेमेंद्र कटरे यांनी केलेली ही बातचीत.

### गोंदिया-भंडारा जिल्ह्याच्या विकासाकडे आपण कसे बघता?


गोंदिया-भंडारा हे दोन्ही जिल्हे माझे केवळ कार्यक्षेत्रच नाही तर कर्मभूमीसुद्धा आहे. यामुळे या क्षेत्राचा सर्वांगीण विकासाला मी माझे आद्यकर्तव्य मानतो. या दोन्ही जिल्ह्यांच्या विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत. जनतेच्या माझ्यावर असलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. येथील जनता माझ्यावर खूप प्रेम करते. या प्रेमामुळेच या भागाच्या विकासाचा ब्लू प्रिंट तयार करून टप्पाटप्प्याने विकासात्मक कामांना सुरवात केली आहे. साकोली ते लाखनी तालुक्याच्या मध्यभागात भेलचा कारखाना सुरु करण्याकरीता पुन्हा प्रयत्न करण्यात येणार असून रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देणारे औद्योगिक क्षेत्र ठरतील, याचा मला पूर्ण विश्वास आहे. गडेगाव येथील अशोक लेलँडच्या कारखान्यात दोन्ही जिल्ह्यातील आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांना स्थान मिळवून दिले असून भविष्यात लेलँडचा विस्तार करण्यावर आपला भर राहणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा येथे असलेला अदानी समूहाचा वीज प्रकल्प आणि बिरसी विमानतळावरील राजीव गांधी वैमानिक प्रशिक्षण अकादमी यांच्यासह आगामी काळात अनेक उद्योग आणण्याचे प्रयत्न आहेत.

### जिल्ह्यातील पर्यटन विकासाबाबतीत काही धोरण ठरविले आहे का?

तसे पाहता आपला संपूर्ण पूर्व विदर्भ हा पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. निसर्गाने या भागाला अगदी भरभरून दिले आहे. या भागातील निसर्गस्थळांचा विकास केल्यास पर्यटनाला चांगलाच वाव मिळू शकेल. विशेष म्हणजे नागपूरचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ व गोंदिया येथील बिरसी विमानतळामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटकांना या भागात सहज आकर्षित केले जाऊ शकते.इटियाडोह आणि नवेगावबांधच्या जलाशयात बोटींगची व्यवस्था केली जाऊ शकते. नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानासह नागझिरा अभयारण्य आणि नव्याने अस्तित्वात आलेला न्यू नागझिरा व नवेगावबांध अभयारण्याच्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील वाघांना सोडण्याचे काम पर्यटनाच्या दृष्टीने सुरू आहेत. पर्यटनाच्या विकासासाठी नागराधाम,कामठा,चोरखमारा,बोदलकसा,चुलबंध,गोठणगाव येथील तिबेटियन वसाहत,सूर्यादेव मांडोदेवी,कालीसरार,हाजराफॉल,कचारगडसारख्या पर्यटनस्थळांच्या विकासासाठी केंद्र व राज्यसरकारसोबत प्रयत्न सुरू आहेत. भविष्यात गोंदिया भंडारा जिल्ह्यात पर्यटन व्यवसायाची नक्कीच भरभराट होईल, यावर माझ्या विश्वास आहे.

### सिंचनविषयक कामाची गती वाढविण्याची गरज आहे. यावर कोणत्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत?

सिंचन प्रकल्पाचे कामाची गती वाढविण्याचे सातत्याने प्रयत्न सुरूच आहेत. गोसेखुर्द प्रकल्प आणि बावनथडी प्रकल्पाला केंद्रसरकारकडून निधी मिळवून दिल्याने आज दोन्ही प्रकल्पांचे काम अंतिम टप्प्यात आले आहे, हे विसरून चालणार नाही. या भागातील झुडपी जंगलामुळे रखडलेले पिंडकेपार,करचखेडा आदी सिंचन प्रकल्प मार्गी लागले आहेत. या प्रकल्पांना सुध्दा हिरवी



झेंडी मिळाल्याने कामांना सुरवात झाली आहे. दोन्ही जिल्ह्यात सिंचनाच्या दृष्टीने चांगले काम सुरू असून राज्यसरकारने कोट्यवधीचा निधी दिला आहे. आता तर मामा तलावाच्या दुरुस्तीसाठी सुध्दा पैसा मिळाल्याने या तलावांच्या दुरुस्तीचे काम लवकरच हाती घेण्यात येणार असून कुठलेही सिंचनाचे प्रकल्प संथगतीने सुरु नाहीत. याउलट १ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. सिंचन झाले तर शेतकरी सुखी आणि समृद्ध होईल.

### गोंदिया जिल्हा निर्मितीला २५ वर्षे उलटून येथे प्रशासकीय कार्यालये आणि कर्मचारी-अधिकाऱ्यांची पदे अद्यापही रिक्त आहेत.यावर प्रकाश टाकाल?

गोंदिया जिल्ह्याची लोकसंख्या सुमारे १३ लाखाच्या जवळपास असून गोंदिया जिल्हा होऊन २५ वर्षाचा काळ लोटला आहे. काही शासकीय कार्यालये अद्यापही याठिकाणी येऊ शकली नाहीत, हे खरे आहे. ती सर्व कार्यालये लवकरच जिल्ह्यात येतील. अधिकारी वर्गाची रिक्त पदे सुध्दा लवकरच भरण्यासंदर्भात शासनस्तरावर आपण चर्चा केली आहे. जिल्ह्यातील जंगल हे आरक्षित असल्याने अनेक विकास कामांना मर्यादा येतात. त्यामुळे काही ठिकाणी बांधकाम करताना अडचणी येतात. तसेच जिल्हा नक्षलग्रस्त वेगळ्या समस्या आहेत. या २५ वर्षात जिल्ह्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिळाले आणि त्या महाविद्यालयाला सुध्दा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव शासनाने द्यावे, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. सर्वच शासकीय कार्यालयातील महत्त्वाची पदे तातडीने भरून नक्षल जिल्ह्यातील समस्या सोडविण्यासाठी आपण लवकरच मुख्यमंत्री व उपमुख्यंमत्र्यांसोबत चर्चा करणार आहोत.

### राजीव गांधी पायलट प्रशिक्षण अकादमीबाबत काय सांगाल?

देशातील पहिले पायलट प्रशिक्षण केंद्र हे रायबरेलीत आहे. अशाप्रकारचे दुसरे प्रशिक्षण केंद्र हे बिरसीचे आहे. हे प्रशिक्षण केंद्र सुध्दा उत्तरप्रदेशातील अमेठी मध्ये होणार होते. परंतु, आपण केंद्रीय विमानवाहतूक मंत्री असल्यामुळे हे केंद्र आपल्या मतदारसंघात व्हावे, अशी विनंती सोनिया गांधी यांच्याकडे व्यक्त केली. त्यांनी आपल्या विनंतीला मान दिल्याने वैमानिक प्रशिक्षण अकादमी बिरसी येथे सुरू केली. आजच्या घडीला हजाराच्यावर वैमानिकांनी या केंद्रातून प्रशिक्षण सुध्दा घेतले आहे. हवाई ट्रेनिंगसंबंधी प्रशिक्षण सुध्दा सुरू झाले आहे. राजीव गांधी पायलट प्रशिक्षण केंद्राचे नाव आता आंतरराष्ट्रीय पातळीवर पोचले आहे. टेक्निकल,इंजिनिअरिंग,एअर ट्रॅफिक कंट्रोल यासारखे विमानविषयक सर्व प्रशिक्षण देण्याची सोय या पायलट ॲकॅडमीत उपलब्ध आहे. तसेच त्या प्रशिक्षणार्थीसाठी राहण्याची उत्तम निवासाची सोय करण्यात आली आहे. कॅनडा येथील सीई कंपनी व भारत सरकारच्या एकत्रित प्रयत्नाने हा प्रकल्प पूर्ण होत आहे.

### मतदारसंघातील रेल्वेच्या विस्तारीकरणाबाबत काय सांगाल?

गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील केवळ रेल्वेस्थानकांचा विकासच नाही तर या दोन्ही जिल्ह्यातून देशाच्या कानाकोपऱ्याला जोडणाऱ्या महत्त्वाच्या रेल्वेगाड्यांचा थांबा मिळवून देण्यात आला आहे. सोबतच नागपूरातून सुटणाऱ्या महाराष्ट्र व विदर्भ एक्स्प्रेस या दोन्ही गाड्या गोंदियापर्यंत विस्तारित केल्या आहेत. नुकतेच दुर्ग-सारनाथ ही उत्तरभारताला जोडणारी महत्त्वाची रेल्वेगाडी गोदियापर्यंत विस्तारित केली असून लवकरच गोंदियास्थानकावरुन सुटेल. चंद्रपूर व जबलपूर मार्गावर सुध्दा गाड्यांच्या फेऱ्या वाढल्या असून गोंदिया ते चंद्रपूर ब्रॉडगेज मार्गाचे विद्युतीकरणाचे काम झाले आहे. गोंदिया रेल्वेस्थानक मॉडेल स्थानक बनविण्याच्या कामाला सुरवात झाली आहे. रेल्वेगाड्यांना उशीर होऊ नये, यासाठी

### आपला पैतृक गाव गोंदिया विकासाच्या बाबतीत मागे असल्याची ओरड केली जाते. त्याबद्दल आपले काय सांगू इच्छिता?

गोंदिया विकासात मागे नाही. विकासाच्या दृष्टीने कामे सुरू आहेत. गोंदिया शहर हे एक चांगले शहर व्हावे, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व पालिकेतील सदस्यांना काम करण्याच्या सूचना सुध्दा दिल्या आहेत. आपण नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून काम केल्याने शहराच्या विकासासाठी काय व कशाची गरज आहे, हे लक्षात ठेवून काम सुरू आहेत. आपल्या काळात तयार केलेले रस्ते आजही गुणवत्ता टिकवून आहेत. त्याचपध्दतीचे काम व्हावे, यासाठी सुध्दा नगरपालिका प्रशासनाला निर्देश दिले आहेत. शहराच्या विकासात दोन भागाला जोडणारा महत्त्वाचा रेल्वेचा लहान उड्डाणपूलाचे काम लवकरच सुरु होणार असून रिंगरोडचे विस्तारीकरण झाले आहे.तर मरारटोली व तिरोडा मार्गावर उड्डाणपुलाचेही काम काही दिवसात सुरु होणार असल्याने शहराचा चेहरा मोहरा बदलणार आहे.



































रौप्य महोत्सव 1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी..

# गोंदिया जिल्हा स्थापनेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला

## हार्दिक शुभेच्छा



**खासदार प्रफुल्लभाई पटेल**
माजी केंद्रीय मंत्री भारत सरकार
कार्याध्यक्ष-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
(अजीत पवार गट)

**सौ.वर्षाताई पटेल**
अध्यक्ष
गोंदिया शिक्षण संस्था



**माजी आमदार राजेंद्र जैन**
अध्यक्ष-गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँक
सचिव गोंदिया शिक्षण संस्था

---

रौप्य महोत्सव 1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी..

# गोंदिया जिल्हा स्थापनेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला

## हार्दिक शुभेच्छा



-:शुभेच्छुक:-

**मा.मनोहर चंद्रीकापुरे**
आमदार
अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्र

---



# गोंदिया जिल्हा स्थापनेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला

रौप्य महोत्सव 1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी..


## हार्दिक शुभेच्छा



-:शुभेच्छुक:-

**इंजि.आशिष बारेवार**
माजी नगराध्यक्ष गोरेगांव
जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा गोंदिया
व माजी सदस्य, जिल्हा नियोजन समिती गोंदिया

---





गोंदिया शहर का नवनिर्मीत ऊड्डान पुल



शासकिय तंत्र निकेतन (पॉलिटेक्नीक)



निर्माणाधिन जिला क्रीड़ा संकुल



शहर की अतिरीक्त पेयजल योजना

रौप्य महोत्सव 1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी..

# गोंदिया जिल्हा स्थापनेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला

## हार्दिक शुभेच्छा



निर्माणाधिन नाट्यगृह एवं व्यापार संकुल



के.टी.एस. जिला रुग्णालय की नवनिर्मीत ईमारत



क्षेत्र में नवनिर्मीत सड़कें



मुर्री में नवनिर्मीत आश्रम स्कुल

-:शुभेच्छुक:-

**मा.गोपालदासजी अग्रवाल**
माजी आमदार
गोंदिया विधानसभा क्षेत्र
माजी अध्यक्ष
लोकलेखा समिती महाराष्ट्र
विधान मंडळ



# जि.प.अध्यक्षांच्या अधिकार कक्षा रुंदावण्याची गरज

जिल्हा परिषद, पंचायत समित्यांना पंचायत राज व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. या पंचायत राज व्यवस्थेत जि.प.अध्यक्षासह पदाधिकारी व पं.स.सभापतींना मानाचे पद आहे खरे, पण प्रशासकीयदृष्ट्या बघितले तर त्यांचे पंख छाटल्याचे दिसून येते. परिणामी, त्यांना विकासात्मक धोरण राबविताना अनेक अडचणी येतात. त्यांना स्वतः निर्णय घेता येत नाही. पंचायत राज बळकटीकरणासाठी पदाधिकाऱ्यांना व्यापक अधिकार देणे गरजेचे आहे. जि.प.अध्यक्ष, पदाधिकारी यांना असे अधिकार मिळाले, तर सीईओंची मर्जी सांभाळण्याची त्यांच्यावर वेळ येणार नाही. आलेल्या तक्रारींवर वेळेत कारवाई करणे शक्य होईल. शिवाय प्रशासकीय व्यवस्थेवर वचक ठेवता येईल, असे मत गोंदिया जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष ॲड. के.आर.शेंडे यांनी बेरार टाईम्स सोबत चर्चा करताना व्यक्त केले.

विकासात्मक धोरण राबविताना पक्षीय राजकारण हे बाजूला सारले जावेत. हे करत असताना अधिकारी व कर्मचारी वर्गाला उद्धट वागणूक देत अपमान केल्याने त्याचा विकास कामावर विपरीत परिणाम होतो, हे ध्यानात घेतले गेले पाहिजे. संपूर्ण समन्वयातूनच विकास शक्य होतो. जिल्हा परिषद ग्रामीण लोकांचे आधारस्तंभ आहे. या संस्थेवर गरिबांना वस्त्र, निवारा सारख्या सोईसुविधा देण्याची जबाबदारी आहे. आमच्यावेळी संसाधने उपलब्ध नसताना देखील आम्ही सर्वांना सोबत घेऊन काम केले. आमच्यासोबत असलेले पहिल्या जिल्हा परिषदेतील व त्यानंतरही जिल्हा परिषदेचे सदस्य झालेले नंतर आमदार झाले, ही आमच्यासाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

सन्माननीय केशवराव मानकर, नरेश माहेश्वरी, भैरसिंह नागपुरे, हेमंत पटले, विजय शिवणकर, हरीश मोरे यासारखे अभ्यासू सदस्यविरोधी पक्षात राहूनही त्यांनी आम्हाला केलेले सहकार्य हे विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. सोबतीला असलेल्या पदाधिकाऱ्यांनी खांद्याला खांदा लावून काम केले. मात्र आज परिस्थिती बघून वाईट वाटते. राजकारणाचे व्यापारीकरण झाले आहे. लोकहिताची दृष्टी हरपलेली दिसते. लोकप्रतिनिधींच्या भूमिकेत बदल अपेक्षित आहे. जे कर्मचारी अधिकारी पगार वाढविण्यासाठी आंदोलन करतात, त्यांनी आपल्या कर्तव्याची जाण ठेवली पाहिजे. ठरलेल्या ८ तासातच प्रामाणिकपणे काम केले तर विकास सहज शक्य आहे. परंतु, लालफिताशाहीत अडकलेले कर्मचारी आपले कर्तव्य विसरले आहेत. यामुळे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कामात केलेल्या चुकारपणाबद्दल दंडात्मक कारवाईची कायदेशीर गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.



**गोंदिया जि.प.चे पहिले अध्यक्षपद भूषविण्याचा मान आपल्याला मिळाला. त्यावेळी नेमकी परिस्थिती कशी होती?**

गोंदिया जिल्हा परिषद अस्तित्वात येण्यापूर्वी भंडारा जिल्हा परिषदेत मला १७ वर्षे जि.प.सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यातही मी ५ वर्षे समाजकल्याण सभापतिपद भूषविले होते. त्या कार्यकाळात केलेल्या कामाचा अनुभव मला गोंदिया जि.प.च्या पहिल्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताना कामात आला. पक्ष असो की विपक्ष सर्व सदस्यांना सोबत घेऊन जिल्हा परिषदेच्या पहिल्या कार्यकाळास सुरवात केली. तेव्हा आमच्याकडे काहीही नव्हते. जुन्याच साधनसामग्रीतून विकासाचा गाडा हाकण्यास सुरवात केली. प्रशासनिक अधिकारी म्हणून एकमेव मुख्य कार्यकारी अधिकारी वगळता सर्वच पदे ही प्रभारी होती. भंडारा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांवर येथील विभागाचे प्रभार होते. ते दोन्ही काम सांभाळून अधिकारी वर्गांनी आम्हाला साथ दिली. त्यामुळेच आज जि.प.विकासाच्या पायऱ्यांवर पुढे आली आहे.

**अध्यक्षपदावर वर्णी लागल्याबद्दल आपण काय सांगू शकाल?**

काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी माझी या पदासाठी निवड केली. माझे सहकारी जि.प.सदस्यांनी त्या निवडीला मनापासून साथ दिल्याने मला आनंद झाला होता. माझ्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचे असे ते क्षण होते. स्वतंत्र असा गोंदिया जिल्हा व्हावा, अशी अनेक वर्षापासून लोकांची मागणी होती. पक्षीय सहभागामुळेच जिल्हा अस्तित्वात आला. मागासलेल्या जिल्ह्याचा विकास व सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी मला या पदामुळे मिळाल्याचा आनंद आहे.

**जि.प.च्या विकासात आपल्याला कोणाची विशेष मदत लाभली?**

जिल्हा परिषद नवी असल्याने आम्ही आधी बांधकाम विभागाची जागा असलेल्या उपविभागीय कार्यालयातून जिल्हा परिषदेच्या कामकाजास सुरवात केली. बाईगंगाबाई रुग्णालयाच्या बाजूला असलेल्या जि.प.च्या जागेत पदाधिकारी वर्गासाठी कार्यालये तयार करून त्याठिकाणाहून काम केले.जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीसह अधिकारी वर्ग व शासनाच्या निधीसाठी आम्हाला तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांची मोलाची मदत मिळाली. त्यांची भेट करून देण्यात आमचे नेते स्व.श्रीकांत जिचकार यांची सुद्धा भूमिका महत्त्वाची राहिली. विशेष म्हणजे जिल्ह्यातील कोणत्याही पक्षाचे आमदार असो ते काँग्रेस की भाजप असे न बघता त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी आम्हाला सर्व स्तरावर सहकार्य केले.

**आपल्या कार्यकाळात राबविण्यात आलेल्या योजना कोणत्या?**

जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या वतीने आपल्या अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात अनेक महत्त्वाच्या लोककल्याणकारी योजना राबविल्या. त्यामध्ये आरोग्याच्या सोयी बळकट करण्यासाठी प्रयत्न केले. सोबतच रस्ते, पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम केले. जिल्हा परिषदेच्या आश्वासित योजनेचा जो निधी पडून होता त्या निधीचा वापरातून त्याकाळी १४ प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र तयार केले. ते करताना कुणाच्या मतदारसंघातला हे बघितले नाही. कावराबांध, मुल्ला, फुटाणा, कोरंभीटोला, इंदोरा खुर्द सारख्या आरोग्य केंद्राची निर्मिती ही आमच्या काळातील असल्याचे सांगत, ज्या शाळांची अवस्था बिकट होती, त्याठिकाणी नव्या वर्गखोल्या तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले होते. दलित वस्ती सुधार योजना, लघुपाटबंधारे विभागाच्या योजना, समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रयत्न केला.


रौप्य महोत्सव 1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी...
बेरार टाईम्स च्या वतीने जिल्हावासियांना शुभेच्छा

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया

### निविदा सुचना क्र.०१ सन २०२४-२०२५ (प्रथम मागणी)

गोंदिया पाणी पुरवठा योजना, दैनंदिन देखभाल व दुरुस्ती अंतर्गत वैनगंगा नदिवरती टंचाई कालावधी मध्ये बंधारा तयार करणे व पुजारी टोला धरणावरुन वैनगंगा नदिमध्ये पाणी सोडण्याबाबतच्या कामाची निविदा मजीप्रा कडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रू.९,९८,१८६/- आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक ०३/०५/२०२४ ते दिनांक १७/०५/२०२४ पर्यंत विभागीय कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, गोंदिया**

















गोंदिया जिल्हा स्थापनेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला
हार्दिक शुभेच्छा
रौप्य महोत्सव
1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी..
-:शुभेच्छुक:-
मा.विजयभाऊ रहांगडाले
आमदार
तिरोडा-गोरेगाव विधानसभा क्षेत्र


गोंदिया जिल्हा स्थापनेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला
हार्दिक शुभेच्छा
रौप्य महोत्सव
1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी..
-:शुभेच्छुक:-
इंजि.राजकुमार बडोले
माजी सामाजिक व न्यायमंत्री महाराष्ट्र शासन
तथा माजी पालकमंत्री गोंदिया जिल्हा


रौप्य महोत्सव
1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी..
गोंदिया जिल्हा स्थापनेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला
हार्दिक शुभेच्छा
डॉ.परिणयजी फुके
-:शुभेच्छुक:-
माजी पालकमंत्री
गोंदिया जिल्हा व
भंडारा-गोंदिया विधान परिषद सदस्य


गोंदिया जिल्हा स्थापनेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला
हार्दिक शुभेच्छा
रौप्य महोत्सव
1999-2024 यशस्वी वाटचाल, उत्तुंग भरारी..
-:शुभेच्छुक:-
जनतेचे आमदार
मा.विनोदजी अग्रवाल
गोंदिया विधानसभा क्षेत्र